क्रमांक : २३८३ /ग-२,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, नागपूर.
दिनांक : १८ डिसेंबर, २०२४

:: **परिपत्रक** ::

या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, सभागृहातील कामकाज पेपरलेस करण्याच्यादृष्टीने विधान भवन, मुंबई तसेच नागपूर येथील विधानसभा व विधानपरिषद सभागृहात नव्याने मल्टीमिडीया कॉन्फरन्स यंत्रणा बसविण्यात आली आहे. अधिवेशन कालावधीत सभागृहामध्ये करण्यात येत असलेले कामकाज सर्व सन्माननीय सदस्यांना त्यांच्या टपालखणांद्वारे कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येते. पेपरलेस ऑफीस या संकल्पनेचे उद्दीष्ट साध्य करण्याच्यादृष्टीने, अधिवेशन कालावधीत सभागृहात सदस्यांना द्यावयाची सर्व कागदपत्रे आता नव्याने बसविण्यात आलेल्या मल्टीमिडीया कॉन्फरन्स यंत्रणेद्वारे उपलब्ध करुन द्यावयाची आहेत. त्यानुषंगाने सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी आता अधिवेशन कालावधीत त्यांच्या कक्षाची सभागृहाशी संबंधित असलेली कागदपत्रे सॉफ्टकॉपीजच्या स्वरूपात (PDF FORMAT) EMAIL द्वारे विधानसभा व विधानपरिषदेतील ध्वनीयंत्रणाचालक यांचेकडे सभागृहाची दैनंदिन बैठक सुरु होण्यापूर्वी एक तास अगोदर, संबंधित कक्षाच्या नियंत्रण अधिकाऱ्यांच्या पूर्वमान्यतेने, उपलब्ध करुन द्यावी. सदरहू सॉफ्टकॉपीज MLS/कक्षाचे नाव/आयुधाचे थोडक्यात नाव/दिनांक (dd/mm/yyyy) उदा. MLS-A-Billno-०१२-१७-डिसेंबर-२०२४ असे जास्तीत जास्त २८ अक्षरांमध्ये करुन ध्वनीयंत्रणाचालक यांना e-mail द्वारे पाठवावे. अधिवेशन कालावधीत अशा प्रकारे प्राप्त होणारी कामकाजासंदर्भातील माहिती मल्टीमिडीया कॉन्फरन्स यंत्रणेमध्ये अपलोड करण्याची जबाबदारी ही त्या-त्या सभागृहातील कार्यरत असलेल्या ध्वनीयंत्रणाचालकांची राहील. उक्त प्रस्तावित कार्यपध्दतीची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी.

विधानपरिषद Email ID : councilmicoperator@gmail.com

विधानसभा Email ID : assemblymicoperator@gmail.com

**( जितेंद्र भोळे )**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

१) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
३) मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
४) सचिव-१ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
५) सचिव-२ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी.
७) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.
८) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
९) सर्व ध्वनी यंत्रणाचालक.